# शाळांमध्ये सायबर बडीज

**मुंबई** : इंटरनेट हा बदलत्या जगाचा पासवर्ड पालकांनीच विद्यार्थ्यांना समजून सांगितला पाहिजे. या माध्यमाचा प्रभावी वापर करत खेळाच्या माध्यमातून अभ्यासक्रम शिकवण्याचा विचार सरकार करत आहे. त्यासाठी शाळांमध्ये सायबर बडीजसारखे उपक्रम सुरू करण्याचा सरकारचा मानस आहे, या अंतर्गत काही मुलांना इंटरनेटबद्दल माहिती देऊन त्यांच्याद्वारे वर्गातील इतर विद्यार्थ्यांना ही माहिती देण्याचे काम हे बडीज करतील, अशी माहिती शिक्षण मंत्री विनोद तावडे यांनी दिली.

अहान फाऊंडेशन आणि क्विकहिल फाऊंडेशन यांनी बोरिवलीच्या प्रबोधनकार ठाकरे नाट्यगृहामध्ये संयुक्तरीत्या आयोजित केलेल्या सायबर सुरक्षा जनजागृती शिक्षण उपक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी शिक्षण मंत्री तावडे यांनी इंटरनेटचे महत्त्व विषद केले. सध्या सगळ्या शाळांमध्ये पालकसभा चालू आहेत. त्यामध्ये पालकांनाही इंटरनेटचे महत्त्व समजावून द्या. मुलगा दोन तास इंटरनेटचा वापर करून घरातून बाहेर पडतो. त्यानंतर त्याने इंटरनेटवर काय पाहिले, हे पालकांनी शोधून काढायला हवे. गुगल हिस्टरीमध्ये जाऊन आढावा घेण्यासाठी पालकांना इंटरनेट वापरता येणे गरजेचे आहे, असा सल्लाही त्यांनी या वेळी दिला.